**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## हिवाळी २०१८ बी.ए. भाग-दोन सत्र-तीनचे जाहीर करण्यात आलेल्या निकालाच्या गुणपत्रिकांबाबत महाविद्यालयांना सूचना

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, हिवाळी २०१८ बी.ए. भाग - दोन सत्र - तीन चा निकाल दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे सदर निकालाच्या मुळ गुणपत्रिका महाविद्यालयांना १५ ते २० दिवसांच्या आंत विद्यापीठाकडून पुरविण्यात येतील.

सदर परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना व पुनर्मूल्यांकन अर्जाकरीता सदर परीक्षेचा निकाल विद्यापीठाच्या sgbau.ucanapply.com/smartexam/public या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून गुणपत्रिकेची प्रत अर्जासोबत विहित केलेल्या शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्याच्या सूचना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आहेत.

याबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्यांना पत्र पाठवून कळविले आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २८/०२/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी